# तंत्र शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य,

3, महापालिका मार्ग, पत्र पेटी क्रमांक 1967, मुंबई 400 001.

दूरध्वनी - 22620601, 22690602, 22641150/51, फॅक्स - 22692102.

E-mail : diplomadesk10dte@gamil.com Internet : http://www.dtemaharashtra.gov.in


परिपत्रक

महत्वाचे

जा.क्र : 10/एनजीपी/प्रवेश/2015/८५०

दिनांक : 26 AUG 2015

प्रति,

प्राचार्य/संस्थाप्रमुख

तंत्रशिक्षण संचालनालयाचे अख्यत्यारीतील

सर्व कायम विनाअनुदानित/खाजगी संस्था.

विषय-फेर परीक्षा देऊन इयत्ता १० वी (एस. एस. सी. परीक्षा) ऑगस्ट-२०१५ मध्ये उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांना शैक्षणिक वर्ष २०१५-१६ मधील पोस्ट एस. एस. सी. प्रथम वर्ष पदविका अभ्यासक्रमाचे प्रवेशाची संधी उपलब्ध करुन देणेबाबत......

उपरोक्त विषयाचे अनुषंगाने सर्व विनाअनुदानित/खाजगी संस्थाचे प्राचार्यांना या परिपत्रकान्वये असे कळविण्यात येते की, माहे मार्च-२०१५ मधील इयत्ता १० वीच्या परीक्षेमध्ये अनुत्तीर्ण (एस. एस. सी. परीक्षा) झालेल्या विद्यार्थ्यांसाठी घेण्यात आलेल्या फेरपरीक्षेचा निकाल एस. एस. परीक्षा मंडळाकडुन दि. २५.०८.२०१५ रोजी जाहीर करण्यात आलेला आहे. सदरच्या परीक्षेमध्ये उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांपैकी जे विद्यार्थी पात्रता निकषांनुसार पदविका अभियांत्रिकी अभ्यासक्रमांमध्ये प्रवेश घेण्यास पात्र व इच्छुक आहेत, अशा विद्यार्थ्यांना तंत्रशिक्षण संचालनालयाकडुन प्रवेशाची एक संधी उपलब्ध करुन देण्यात येत आहे. त्यासाठी प्रवेश नियमावलीमध्ये नमुद करण्यात आलेल्या नियमांचे अधिन राहुन पदविका अभ्यासक्रमांचे प्रवेशासाठी उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांना संस्थास्तरावर करावयाच्या प्रवेशासाठी पात्र समजण्यात येईल.

तरी पोस्ट एस. एस. सी., प्रथम वर्ष पदविका अभियांत्रिकी अभ्यासक्रसमांसाठी ज्या कायम विनाअनुदानीत/खाजगी संस्थामध्ये संस्थास्तरावरील जागा व Vacancy Against CAP च्या जागा अद्याप रिक्त आहेत, अशा संस्थांनी ऑगस्ट - २०१५ मध्ये उत्तीर्ण झालेल्या इच्छुक विद्यार्थ्यांना संस्थास्तरावरुन गुणवत्तेनुसार प्रवेश देण्यास या परिपत्रकान्वये परवानगी देण्यात येत आहे. तथापी सदरच्या संस्थांनी प्रवेश प्रक्रीयेची कार्यवाही दि. २९.०८.२०१५ पर्यत पूर्ण करावी व सदर प्रवेशित विद्यार्थ्यांची माहिती उशीरात उशीरा दि. ०३.०९.२०१५ सायंकाळी ५.०० वाजेपर्यत अपलोड करावी.

( डॉ. सुभाष महाजन )

संचालक, तंत्रशिक्षण, म.रा.,मुंबई-१

---

क्रमांकः-विकाअ/शिक्षण/प्रवेश/२०१५/2105

सहसंचालक, तंत्रशिक्षण वि.का.अमरावती.

दिनांक 27 AUG 2015

प्र. सहसंचालक तंत्रशिक्षण

अमरावती.

प्रत :-१) प्राचार्य, सर्व विना-अनुदानित अभियांत्रिकी पदविका संस्था यांना कळविण्यात येते की, वरील पत्राच्या अनुषंगाने आवश्यक कार्यवाही करुन अहवाल या कार्यालयास सादर करावी.

२) प्रोग्रामर, तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, अमरावती यांना संकेतस्थळावर टाकण्याकरीता.